C/1

# संशोधन संचालक

## डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला,- ४४४१०४(महा.)

डॉ.व्हि.के.खर्चे
संशोधन संचालक

फोन - (ऑ) ०७२४-२२५८४१९
Fax – 0724 - 2258419
Emile:-director_res@pdkv.ac.in

---

जावक क्र/DR/TF/ ५७१ /२०२४ दिनांक :- 31-5-2024

## परीपत्रक

संदर्भ :- १) मा. कुलगुरू कार्यालय मंजुरी नस्ती क्र.v/११०/२०२४ दिनांक २४/०४/२०२४
२) मा. नियंत्रक कार्यालय मंजुरी नस्ती क्र. ४७/२०२४ दिनांक २४/०४/२०२४

उपरोक्त संदर्भीय क्र.१ व २ अन्वये जे.सी.बी. मशिनव्दारे भाडे तत्वावर (कृषिउपयोगी) बिजोत्पादन प्रक्षेत्रावर/ शेतातील काटेरी झुडपे काढणे, सखल भागात नाल्या व चर काढणे, तळयातील गाळ काढणे व शेतीला बांध घालने ई. कामे करण्यासाठी मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र,वणी रंभापुर कार्यालया कडुन ई-निवीदाव्दारे पुढील तीन वर्षा करीता (सन २०२३-२४, २०२४-२५ आणि २०२५-मार्च २६ पर्यत) खालील दिलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहुन मा.कुलगुरू महोदय, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांच्या मान्यतेणे प्रती तासा प्रमाणे भावदर्शक तुलनात्मक तक्त्या मध्ये दर्शविल्या नुसार <u>दर रू. ८७० /- प्रती तास, जि.एस.टि.सह</u> या प्रमाणे निच्छीत करण्यात आलेले असुन सर्वात कमी दर M/s Gadge Maharaj Majur Kamgar Sahakari Sanstha Shivapur, Akola(mo.no.-8767826941) यांचे आहे. सदर दर हे डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला अंतर्गत असणारे कार्यक्षेत्रामधील विदर्भातील ११ जिल्ह्या करीता अटी व शर्तीच्या आधिन राहुन लागु राहील.

### अटी /शर्ती

१. जे.सी.बी. मशीनव्दारे करावयाचे कामे हे संबंधित प्रक्षेत्रावरील प्रभारी अधिकारी यांचे नियंत्रणाखाली करावे लागेल व त्यांनी दिलेल्या संबंधित क्षेत्रातील स्थळांनुसार कामे करावे लागेल.
२. क्षेत्र (Area) नुसार कामाचे परिमाण कमी किंवा जास्त करण्याचे अधिकार राखुन ठेवण्यात आले आहेत व त्यानुसारच कार्यालयीन आदेश देण्यात येतील.
३. महाराष्ट्र शासनाचे, कामगार विषयक कायद्या व नियमांचे पालन करण्याची जबाबदारी संबंधीत जे.सी.बी. मशीन धारकाची राहील.
४. कामा दरम्यान कोणतीही जिवित/वित्तहानी झाल्यास त्यास डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला जाबदार राहाणार नाही. तसेच कामा दरम्यान कोणतेही शासकीय मालमत्तेचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसे झाल्यास शासकीय नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.
५. सदरचे काम कोणत्याही परिस्थितीत ३० दिवात पूर्ण करणे बंधनकारक आहे. दिलेल्या मुदतीत कामे पूर्ण करणे बंधनकारक आहे. दिलेल्या मुदतीत कामे पुर्ण न केल्यास पुर्व सुचना/नोटीस न देता निविदा रद्द करण्यात येतील.
६. निविदा मंजुर झाल्यानंतर काम करणेस निविदा धारक असक्षम ठरल्यास मंजुर निविदेमधील दराने सदरचे काम अन्य निविदाधारकाकडून पुर्ण करून घेण्याचा अधिकार संबधीत कार्यालय प्रमुख यांचे कडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत.
७. ज्या ठेकेदाराच्या नावे निविदा मंजुर झाले आहे. त्या मुळ ठेकेदारस काम करावे लागेल. कामे अर्धवट स्वरुपात टाकुन दिल्यास केलेल्या कामाची कोणतीही रक्कम दिली जाणार नाही तसेच सदर मंजुरी प्राप्त जे.सी.बी. मशीन ठेकेदाराने सदर कामे करण्यास नकार दिल्यास किंवा अकार्यक्षमता दर्शविल्यास मंजुरी प्राप्त दराप्रमाणे दुस-या ठेकेदाराने कामे करण्यास सहमती दर्शाविल्यास ते काम त्यांना देण्यात येईल
८. शासन निर्णयाप्रमाणे स्वामित्वधन, आयकर व त्यावरील अधिभार, आयकर जीएसटी रक्कम देय रक्कमेतुन वसुल करण्यात येईल.
९. Rates adopted in the estimate are as per Government of Maharashtra, Public Work Department Commn Schedule of Rates with rate analysis.
१०. L-1 निविदाधारकास जीएसटी व सर्व कर शुल्कासह प्रशासकीय मंजूर रक्कमेच्या प्रस्ताव मंजूर करण्यात येईल याची निविदा धारकांने नोंद घ्यावी. कंत्राटदाराने शासकीय विमा निधी महाराष्ट्र राज्य यांच्याकडे कंत्राटी काम व त्यांचाकडे काम करण्यासाठी नियुक्त केलेल्या कामगारांचा विमा उतरविणे अनिवार्य राहील.शासकीय विमा आगाऊ स्वरुपात भरणा करून त्याचे चलान प्रथम देयकासोबत सादर करण्यात यावे. अन्यथा देयकातुन १ % रक्कम वसुल केली जाईल.
११. प्रशासकीय आणि तांत्रीक मंजूरीच्या अधीन राहून, आवश्यकतेनुसार कामाचे कार्यालयीन आदेश देण्यात येतील. तसेच अनुदान उपलब्धतेनुसार देयके अदा करण्यात येतील, याबाबत नोंद घेण्यात यावी.

१२. संबधीत विभाग प्रमुख यांनी (समितीने) कामाची पाहणी केल्यानंतर, योग्य व कामांच्या गुणवत्तेच्या तसेच कामे पुर्णत्वाचा दाखला संबधीत विभाग यांनी कार्यालयास सादर केल्यानंतर, सदर काम समाधाणकारक व गुणवत्तापूर्ण झाले असल्याचा दाखला दिल्यानंतरच कंत्राटदारास देयक अदा केले जाईल.

१३. कंत्राटदार यांनी काम सुरू करण्यापूर्वीचे आणि काम पूर्ण झाल्यानंतरचे छायाचित्र देयकासोबत जोडणे आवश्यक राहील. तसेच संबधीत विभागावरील जे.सी.बी.मशीन व्दारे झालेल्या कामा नंतर सर्व प्रकारचे काटेरी झुडपे,व इतर पडीतातील काटेरी झुडपांची एका जागी ठिग लावण्यात यावा, तसेच त्यामुळे झालेले खड्डे‌ड बुजविण्यात यावे.

१४. काम करतांना संबंधित विभागाच्या आवश्यक असलेल्या परवानग्या घेणे बंधनकारक राहील.

(डॉ. व्हि.के.खर्च)
संशोधन संचालक
डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला

प्रतिलिपी :-

१) मा. कुलसचीव डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना माहिती करिता सविनय सादर.
२) मा. नियंत्रक डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना माहिती करिता सविनय सादर.
३) मा. कुलगुरूचे तांत्रीक सचिव यांना मा. कुलगुरू महोदय, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना माहिती करिता सविनय सादर.
४) सर्व संचालक, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना माहिती करिता सादर.
४) मुख्य बिजोत्पादन अधिकारी, म.प्रा.प्र.वणी रंभापुर, यांना माहितीस व पुढील योग्य कार्यवाहिस.
५) सर्व वरीष्ठ अधिकारी डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना माहिती करिता सादर.
६) सर्व विभाग प्रमुख, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना माहिती करिता सादर.
७) प्रभारी अधिकारी कृषि संशोधन माहिती प्रमाणी कक्ष,डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला.यांना विद्यापीठ संकेतस्थळावर व्यापक प्रसिध्दी देणे करिता सादर.

Officer In Charge, Agricultural Research Station, Dr. P.D.K.V.
Inward No. 304
Date 31/5/24